# INDIAN DEMOCRACY AND ITS CHALLENGES



[illegible]DISCIPLINARY NATIONAL SEMINAR

[illegible]

[illegible] Political Science

[illegible] College

Malwadi Kotoli

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 95. | मोहन गणपती हजारे | दहशतवाद : भारतीय लोकशाहीसमोरील एक आव्हान | 374 To 380 |
| 96. | प्रा. सुनिता शरद इंगळे | भारतातील लोकशाही प्रक्रिया आणि राजकारण | 381 To 382 |
| 97. | धनराज रावसाहेब बिक्कड | शाश्वत विकास व आव्हाने | 383 To 387 |
| 98. | प्रा. डी.एन. महाडिक<br>कु. सोनाली सुहास सुतार<br>कु. दिपक सुरज शंकर | भारतीय लोकशाहीसमोरील आव्हानांचा अभ्यास | 388 To 394 |
| 99. | नामदेव आप्पा नांदवडेकर | अंधश्रध्दा : भारतीय लोकशाहीसमोरील मोठे आव्हान | 395 To 398 |
| 100. | आनंद बांदेकर | भारतीय लोकशाही व महिला सक्षमीकरण | 399 To 401 |
| 101. | संभाजी राजाराम उबारे | भारतीय लोकशाही व त्यासमोरीलआव्हाने | 402 To 403 |
| 102. | आर.डी. पाटील | स्त्री सक्षमीकरण-संरक्षण | 404 To 409 |
| 103. | देविदास व्ही. भोसले | सोशल मिडिया द्वेष पसरविण्याचे नवीन साधन आणि त्याचा अंतर्गत सुरक्षितेवरती होणारा परिणाम | 410 To 416 |
| 104. | मोनालिसा अ खानोरकर | स्त्रीयांना निसर्गतः मिळालेला मानवाधिकार | 417 To 419 |
| 105. | प्रा ज्योती उद्धवराव मामडगे | मानव अधिकार व स्त्री | 420 To 422 |
| 106. | श्रीमती एम.एम.पाटील | भारतीय लोकशाहीमधील स्त्री शिक्षणाची भूमिका | 423 To 425 |
| 107. | नम्रता अर्जुन डंगवले | भारताच्या विकासासाठी स्त्री सक्षमीकरणाची गरज | 426 To 430 |
| 108. | सहा.प्रा.रूपाली सुनिल पाटील | शाश्वत विकास आणि आव्हाने | 431 To 435 |
| 109. | कु. राजाक्का बाळू चौगले | भारतीय लोकशाहीचे स्थित्यंतरे | 436 To 437 |
| 110. | व्ही. एस. यमगेकर | खेळ व खेळाडुंच्या विकासात शासनाचे प्रयत्न आणि योगदान | 438 To 439 |
| 111. | संयोगिता दिलीप मोरे | भारतीय लोकशाही व आर्थिक धोरण | 440 To 442 |
| 112. | सौ.सुषमा विलासराव जाधव | महिला सबलीकरण : सहकारी चळवळ | 443 To 446 |
| 113. | प्रभूदास आनंदाराव खावडे | लोकशाही समोरील लोकशाही मार्गाने येणा–या फॅसिझमचे आव्हाने | 447 To 449 |
| 114. | प्रा. शरद विठ्ठल पाटील | लोकशाही समोरील आव्हान - जातियता | 450 To 454 |
| 115. | प्रा.संतोष निवृत्ती कांबळे | भारतीय लोकशाही समोरील आव्हान- भ्रष्टाचार | 455 To 456 |
| 116. | शितल चंद्रकांत पाटील | भारतीय संविधान आणि महिला सक्षमीकरण | 457 To 459 |
| 117. | सचिन श्रीरंग चव्हाण | भारतीय लोकशाही पुढील आव्हान : अंतर्गत सुरक्षा | 460 To 463 |
| 118. | उदय बालासो शिंदे | तुकारामांच्या अभंगवाणीतील काव्यसौंदर्य, तत्कालीन लोकशाही मुल्य | 464 To 467 |
| 119. | रोहिणी रामचंद्र शेवाळे | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | 468 To 470 |
| 120. | गजानन विठ्ठल बोधले | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | 471 To 474 |
| 121. | डॉ. करीम नबी मुल्ला | निवडणुकीतील गुन्हेगारी व संपत्तीचा वाढता प्रभाव: लोकशाही समोरील आव्हान | 475 To 477 |




Scanned with CamScanner

# निवडणूकीतील गुन्हेगारी व संपत्तीचा वाढता प्रभाव : लोकशाही समोरील आव्हान


**प्रा. डॉ. करीम नबी मुल्ला,**
श्री. आर. आर. पाटील कॉलेज,
सावळज, ता. तासगाव, जि. सांगली.


**प्रस्तावना**

लोकांनी चालविलेल्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सत्तेला आपण लोकशाही म्हणतो. आधुनिक काळामध्ये लोक आपले प्रतिनिधी निवडतात. निवडलेल्या प्रतिनिधींमार्फत राज्यकारभार चालविला जातो. त्यास प्रातिनिधिक लोकशाही म्हटले जाते. अर्थात लोकशाहीमध्ये राज्याची सत्ता एक व्यक्ती अथवा एका समूहाच्या हातामध्ये नसते. राज्याची सत्ता संपूर्ण जनसमुदायाकडे दिलेली असते. लोकशाही ही संज्ञा अतिशय व्यापक आहे. लोकशाहीमध्ये व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्ति विकासाला प्राधान्य दिले जाते. राज्यकारभारात प्रत्येक व्यक्तीला सहभागी होण्याची समान संधी उपलब्ध करून दिली जाते. यासाठी समतेचे तत्व स्विकारले जाते. अर्थात राजकीय, आर्थिक, सामाजिक समता प्रस्थापित करून व्यक्तींचा सर्वांगिण विकास हे उद्दिष्ट साध्य करू इच्छिणारी पध्दती म्हणजे लोकशाही असे म्हणता येते. अशा या भारतीय लोकशाहीमध्ये राजकीय प्रक्रियेमध्ये काही आव्हाने निर्माण झाल्यामुळे लोकशाहीच्या मूळतत्वांना बाधा पोहोचण्यास सुरवात झाली आहे. अनेक आव्हानांपैकी निवडणूकीतील वाढता पैशांचा व गुन्हेगारी प्रवृत्तींचा प्रभाव भारतीय लोकशाहीसाठी चिंतेचा विषय बनला आहे. प्रस्तुत निबंधात या घटकासंदर्भात अभ्यास केला आहे. याची मांडणी राजकीय विश्लेषणात्मक पध्दतीने करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी काही दुय्यम प्रकाशित साधनांचा आधार घेतला आहे.

## निवडणूकीतील संपत्ती व गुन्हेगारी प्रवृत्तीचा प्रभाव

भारतीय निवडणूकांमधील वाढता संपत्तीचा वापर व गुन्हेगारी प्रवृत्तीचा प्रभाव चिंताजनक बनला आहे. निवडणूकीत मतदान करणे, प्रचार करणे, निवडणूक लढविणे, सरकारच्या धोरणावर टीका करणे आदी राजकीय हक्क प्रत्येक नागरिकास असतात. ते समानतेने दिलेले असतात. मात्र सध्या भारतीय लोकशाहीचे निरीक्षण केले असता, श्रीमंत, धनिक लोकांची मोठया प्रमाणावर मक्तेदारी झाल्याचे दिसून येते. तसेच धनाढ्य लोकांचा प्रभाव मोठया प्रमाणात निर्माण झाल्याचे दिसून येते. त्यामुळे समानतेने राजकीय हक्क असतानाही राजकारण हे केवळ श्रीमंत लोकांची मक्तेदारी बनले असल्याचे दिसून येते. यामुळे लोकशाहीच्या मूळतत्वांना धोका पोहोचतो.

भारतातील निवडणूकांमध्ये पैशाचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे. राजकीय पक्षांना मोठया प्रमाणावर 'निवडणूक निधी', उद्योगपती, भांडवलदार पुरवितात. त्याची विवरणपत्रे वा स्पष्टीकरणे पक्षामार्फत वा उमेदवारामार्फत स्पष्टपणे दिलेली नसतात. 'पेटी', 'खोका' असे परवलीचे शब्दप्रयोग सहजपणे वापरले जातात. याबाबतच्या रितसर नोंदी ठेवल्या जात नाहीत. लोकशाहीमध्ये सत्तांतर घडवून आणण्यासाठीचा शांततामय मार्ग म्हणजे निवडणूक. मात्र संपत्तीच्या वारेमाप खर्चामुळे व वाढत्या हिंसाचारामुळे मुक्त व निर्भय वातावरणात वाढत असल्यामुळे, निवडणूका पार पाडण्याच्या कल्पना हवेतच विरल्या जातात. मतदारांना धाक दाखविणे, आर्थिक प्रलोभने देणे, पैशांचे वाटप, पैशाचा वापर करून हुल्लडबाजीस प्रोत्साहन देणे आदी प्रकार मोठया प्रमाणावर होतात. निवडणूक जिंकण्यासाठीची स्पर्धा अक्षरशः जिवघेणी बनलेली आहे. पैशाच्या बळावर भाडोत्री गुंड पोसले जातात. त्यातून मोठया प्रमाणावर हिंसा घडवून आणली जाते. यातूनच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांनाही राजकीय महत्वाकांक्षेचे धुमारे फुटतात. अनेक गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक सध्या संसद व विधानसभेमध्ये बसलेले दिसून येतात. संपत्ती व दडपशाहीच्या माध्यमातून ते शिखरापर्यंत पोहचले आहेत. सामान्य व्यक्ती अतिशय हतबलतेने याकडे पाहत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयामुळे आपणास याची खोली–रुंदी लक्षात येईल. १३ डिसेंबर २०१७ रोजी सर्वोच्च न्यायालयाने लोकप्रतिनिधी विरुध्दच्या खटल्यांसाठी जलद न्यायालये स्थापन करण्याच्या योजनेला मान्यता दिली. १ मार्च २०१८ पर्यंत १२ विशेष न्यायालये कार्यान्वित करण्यासंबंधीचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिलेले आहेत. सध्यस्थितीत देशभरातील एकूण १५८१ आमदार–खासदारांवरील फौजदारी

गुन्ह्याचे खटले न्यायालयात प्रलंबित आहेत. या विशेष न्यायालयाच्या स्थापनेसाठी संबंधित राज्यांना ७.८० कोटी निधी देण्याचे निर्देशही सर्वोच्च न्यायालयाने केंद्र शासनाला दिले आहेत. खासदारावरील खटले सुनावणीसाठी दोन तर आमदारावरील सुनावणीसाठी बिहार, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, आंध्र, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र, तामिळनाडू आदी राज्यांमध्ये प्रत्येकी एक विशेष न्यायालये स्थापन होणार आहेत. अर्थात या निर्णयामुळे आपणास असे दिसून येते की, लोकप्रतिनिधीमार्फत होणाऱ्या गुन्ह्यांच्या प्रमाणात खूप वाढ होत आहे. ही भारतीय लोकशाहीसमोरील मोठी गंभीर समस्या बनू लागली आहे.

पैसा व गुन्हेगारी हे दोन्ही घटक परस्परांना पूरक आहेत. राजकीय पक्ष निवडणूकामध्ये निवडून येण्याचा निकष म्हणूनही या दोन घटकाकडे पाहू लागले आहेत ही एक मोठी चिंतेची बाब आहे. मॅन, मसल्स मनी, माफीया हे 'एम' ज्यांच्याकडे अधिक प्रभावीपणे आहेत, ते उमेदवारीचे प्रबळ दावेदार ठरू लागले आहेत. यासभूतच बिल्डर, मोठे प्रशासकीय अधिकारी, राजकीय नेते यांची एक 'संघटीत लूटशाही' निर्माण झाल्याचे दिसून येते. यांच्यामार्फत गुंडगिरीला आश्रय दिला जातो. सामान्य माणूस या राजकीय प्रक्रियेपासून खूप लांब फेकला गेला आहे. असोसिएशन फॉर डेमॉक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणाच्या अहवालानुसार कर्नाटकातील २०३ आमदारांचे वार्षिक उत्पन्न १११.४ लाख रुपये तर महाराष्ट्रातील २५६ आमदारांचे वार्षिक उत्पन्न ४३.४ लाख रुपये असल्याचे स्पष्ट होते. राजकीय पक्ष उमेदवारी देतानाही आर्थिक निकष बघतात. राज्यसभा, विधान परिषदेच्या निवडणूकीत तर खूप मोठया प्रमाणावर आर्थिक उलाढाली होतात. कायदेमंडळाच्या या वरिष्ठ सभागृहातून उद्योगपती, बिल्डर, धनिकांची संख्या वाढत असल्याचे दिसून येते. बिहारमधील संयुक्त जनता दलाचे राज्यसभेचे खासदार महेंद्रप्रसाद सिंह यांची संपत्ती ४ हजार कोटी रुपये आहे. सध्याची त्यांची ही राज्यसभेची सातवी टर्म आहे. २११ देशांचा दौरा त्यांनी केला आहे. गतवर्षी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणूकीत घाटकोपरमधील वार्ड १३२ चे भाजप उमेदवार पराग शहा यांची संपत्ती ६९० कोटी असल्याचे स्पष्ट झाले. तसेच त्यानंतर झालेल्या बीड विधानपरिषद निवडणूकीत ऐनवेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या उमेदवाराने माघार घेतली. त्यांनी जाहिर केलेली संपत्ती पाच कोटी होती. नंतर पक्षाने दुसऱ्या अपक्ष उमेदवारास पाठिंबा दिला. त्या उमेदवाराची संपत्ती ७४ कोटी होती. या प्रकरणाची चर्चा उघडपणे माध्यमांमध्ये आली. वरील उदाहरणे केवळ प्रातिनिधीक स्वरुपाची आहेत. यावरून हे स्पष्ट होते की, निवडणूकीच्या राजकारणामध्ये श्रीमंत, पैसेवाले यांचाच प्रभाव मोठया प्रमाणावर दिसून येतो.

राजकारण हे विकासाचे साधन न बनता, ते सत्ता संपत्ती व प्रतिष्ठा मिळविण्याचे साधन बनले आहे. त्यासाठी मोठया प्रमाणात सत्ता–संपत्तीचे दुष्टचक्र सुरु आहे. राजकारणात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. पूर्वी पडद्याआड राहून राजकीय पक्षांना मदत करणारे सराईत गुन्हेगार आता उघडपणे निवडणूका लढवून खासदार, आमदार म्हणून मिरवू लागले आहेत. सामान्य मतदारांना, लोकांना त्यांचे उपद्रवमूल्य सहन करावे लागते. मतदार यांचेपर्यंत जातच नाहीत. मतदार–लोकप्रतिनिधी हे नाते न राहता देणारा–घेणारा असे व्यवसायिक स्वरुप त्यास आल्याचे दिसून येते. त्यामुळे सुशिक्षित, चांगले लोक राजकीय क्षेत्रापासून दूर होऊ लागले आहेत. कायदेमंडळामधील चांगल्या चर्चेचे वातावरण नाहिसे झाले आहे. मुद्याऐवजी गुद्यांची भाषा वापरली जाते. कायदेनिर्मितीवर अभ्यासपूर्ण चर्चा करणारे प्रतिनिधींचे प्रमाण कमी होत चालले आहे. पैसा व गुंडगिरीच्या जोरावर निवडून आलेले लोकप्रतिनिधी या लोकशाही मूल्यांची प्रतारणा करताना दिसतात. घटनात्मक संकेतांची अनेकवेळा पायमल्ली होते. सभागृहात असंसदीय भाषा मोठया प्रमाणावर वापरली जाते

भारतीय सामाजिक व्यवस्थेमधील दारिद्र्य हा एक घटक राजकारणामध्ये कळीचा मुद्दा बनला आहे. चमत्कारी, जाहिरातबाजीच्या भपकेबाजपणाला गरीब, दरिद्री लोक बळी पडतात. आर्थिक प्रलोभनांना ते लोक भुलतात. पैसा, जेवणावळी, वस्तूंचे वाटप करून मतदारांना भुलविण्याचे प्रकार मोठया प्रमाणावर वाढत आहे. भारतीय लोकशाहीतील हे चित्र अत्यंत घातक व निराशजनक आहे.

### उपाययोजना

१. प्रसारमाध्यमांनी मतदारांचे तटस्थपणे राजकीय सामाजीकरण योग्य प्रकारे करणे महत्वाचे आहे. प्रसारमाध्यमांना लोकशाहीचा चौथा खांब म्हटले जाते. यावरून त्यांचे लोकशाहीतील महत्त्व लक्षात येते. त्यांची भूमिका महत्वाची आहे.

२. राजकीय, आर्थिक भ्रष्टाचारातील गुन्हेगारांना कडक शिक्षा करण्यात.

३. राजकीय क्षेत्रातील वा 'व्हाईट कॉलर' गुन्हेगारांना तुरुंगातील पंचतारांकित व्यवस्था बंद करावी. इतर सामान्य कैद्याप्रमाणे त्यांना वागणूक द्यावी.

४. पदावरील मंत्री वा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा गुन्हा सिध्द झाल्यास तात्काळ शिक्षा द्यावी व त्याने त्या पदावरील भोगलेले सर्व आर्थिक फायदे वसूल करावेत.

५. गुन्हेगारीप्रवृत्तीच्या प्रतिनिधींना परत बोलाविण्याचा (राईट टू रिकॉल) जनतेला द्यावा.

६. सर्वच राजकीय पक्षांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या व्यक्तीस उमेदवारी देऊ नये.

७. उमेदवारी देताना शिक्षण, सामाजिक कार्य आदी घटक विचारात घ्यावेत.

८. गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या उमेदवाराची प्रसारमाध्यमांनी दखल घेवू नये, त्यास विनाकारण प्रसिध्दी देऊ नये.

९. निवडणूक काळात पैसे, वस्तू वाटप करताना पकडले गेल्यास व आरोप सिध्द झाल्यास निवडणूक लढविण्यास त्यांना आजन्म बंदी घालण्यासारखे नियम होणे आवश्यक आहे. त्यामुळे जरब बसेल.

१०. समाजातील दारिद्र्य कमी करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखला पाहिजे. सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित होण्यासाठी दारिद्र्य निर्मूलनाच्या योजना अधिक कार्यक्षमपणे राबविल्या पाहिजेत.

११. संविधानातील लोकशाही मूल्यांची जोपासना होण्यासाठी व त्यांचे महत्त्व पटवून देण्यासाठी शाळा, महाविद्यालयातील नवमतदारांसमोर लोकशाहीसमोरील आव्हानांची चर्चा जाणिवपूर्वक घडवून आणली पाहिजे.

१२. अभियांत्रिकी, वैद्यकीय, तांत्रिक व व्यवसायिक शिक्षण घेणाऱ्या-देणाऱ्या विद्यार्थी व शैक्षणिक संस्थामधून याविषयी जाणीवपूर्वक चर्चा घडवून आणणे आवश्यक आहे.

१३. आदर्श वा प्रामाणिक लोकप्रतिनिधींना विकासकामांसाठी खास निधीची तरतूद करण्यात यावी. त्यासाठीचे स्वतंत्र निकष ठरविले जावेत. उदा. कायदेमंडळातील उपस्थिती, चर्चेमधील सहभाग, मतदारांशी संपर्क इ.

## समारोप

१९९० नंतरचे दशक सर्वाधिक वृध्दीदर आणि अर्थव्यवस्थेत सुधारणा घडविणारे दशक म्हणून साजरे केले जाते. मात्र याच दशकात गरीबी वाढली होती. बालमजूर, स्त्रिया आणि स्थलांतरितांचा समावेश असणारे असंघटीत क्षेत्र, संघटीत क्षेत्राऐवजी वाढत होते. त्याचबरोबर शहरी झोपडपट्ट्या झपाट्याने वाढल्या. आणि एक नव्या प्रकारचे 'माफियाराज' वाढल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातही अशा तोंडावळ्याचा नसला तरी दुसऱ्या मुखवट्याचा तोच चेहरा दिसून येतो. त्यामुळे बेरोजगारी, जातीय हिंसाचार, घुसखोरी, दहशतवाद आदी कारणांमुळे राजकारणातील नैतिकता कोठे शिल्लक आहे का? असा प्रश्न मनामध्ये उपस्थित होतो.

स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकशाहीने खूप चढ-उतार अनुभवले आहेत. युध्द, नैसर्गिक आपत्ती, नेतृत्वाची हत्या, आणीबाणी, धार्मिक-जातीय दंगली अशा अनेक नैसर्गिक, मानवी संकटासमोर भारतीय लोकशाही रुपी मंदिराची साधी वीट ही हलली नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे भारतीय संविधान होय. मात्र गेल्या काही वर्षात भ्रष्टाचार, राजकारणातील गुन्हेगारी, दहशतवाद, संपत्तीचा वारेमाप वापर आदी कारणांमुळे काही आव्हाने उभी ठाकली आहेत. हा संक्रमणाचा काळ ही जाऊन, इतर राजकीय व्यवस्थांच्या तुलनेत भारतीय लोकशाही निश्चितच यशस्वी होईल.

## संदर्भसूची

१. भोळे भा. ल., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण.
२. व्होरा राजेंद्र, पळशीकर सुहास, भारतीय लोकशाही आणि अर्थ व्यवहार.
३. दैनिक लोकसत्ता १८ मार्च २०१८
४. दैनिक लोकमत ०९ फेब्रुवारी २०१७.



Scanned with CamScanner